**नि.दि.दावा क्र. १७३/२०२० मध्ये निशानी क्र.२३ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र. १ ने ' विना कैफियत' चा आदेश रद्द करुन कैफियत स्विकारण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी/ अर्जदाराचे असे कथन आहे की, त्याला प्रकरणातील महत्वाची कागदपत्रे मुदतीत प्राप्त झाली नाहीत. मार्च, २०२० ते फेब्रुवारी, २०२१ पर्यंत कोरोना रोगाचा प्रादुर्भाव असल्यामुळे त्याला कैफियत विहित वेळेत दाखल करता आली नाही. त्याला कैफियत दाखल करण्याची संधी नाकारण्यात आली तर त्याचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे. सबब, सदरचा अर्ज.

३. वादींनी अर्जास आक्षेप नोंदवून योग्य तो आदेश करण्याची विनंती केलेली आहे.

४. उभय पक्षांच्या विद्धवान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. युक्तीवादादरम्यान वादीतर्फे विद्वान विधिज्ञांनी अर्ज हा प्रकरण प्रलंबीत ठेवण्यासाठी दाखल केल्याचे कथन केले.

५. दावा मालकी घोषीत करुन निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. १/ अर्जदार हा दि. ०८.०९.२०२० रोजी स्वत:हून न्यायालयात हजर झालेला आहे. त्याचवेळी प्रतिवादी क्र. १ ला कैफियत दाखल करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली. परंतु विहित मुदतीत कैफियत दाखल करण्यास प्रतिवादी क्र. १ अपयशी ठरल्यामुळे दिनांक ०६.०३.२०२१ रोजी त्याच्याविरुध्द विनाकैफियत प्रकरण चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्र. १ ने सदरचा अर्ज दिनांक ०६.०३.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. प्रकरणाचे अवलोकन करता असे दिसून येते की, कैफियत दाखल करण्यास प्रतिवादी क्र. १/ अर्जदारास जवळपास तीन महिने विलंब झालेला आहे. जरी असले तरी दाव्यामध्ये स्थावर

मिळकतीबाबत उभय पक्षाचे हक्क संबंध गुंतलेले आहेत. प्रकरणाचे गुणदोषावर निराकरण होण्यासाठी प्रतिवादी/ अर्जदाराला त्याची कैफियत मांडण्याची संधी देणे गरजेचे व न्यायोचित आहे. परंतू कैफियत करण्यासाठी प्रतिवादीकडून झालेला विलंब पाहता वादींना त्याबाबत खर्च देणे योग्य ठरेल. अशा परिस्थितीत वरील सर्व विवेचनावरुन न्यायाचा हेतू साध्य करण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये ३००/- इतक्या खर्चावर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १/ अर्जदार याच्याविरुध्द पारीत झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करुन त्याला कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादी/ अर्जदार याने वादींना पुढील तारखेपर्यंत अथवा न्यायालयाने वाढवुन दिलेल्या तारखेपर्यंत सदर अर्जाचा खर्च देणे बंधनकारक राहिल. तसा खर्च पुढील तारखेपर्यंत न दिल्यास सदरचा अर्ज आपोआप खारीज समजण्यात यावा.

BABASO SANJAY SANKPAL

Digitally signed by BABASO SANJAY SANKPAL
Date: 2021.12.07 18:04:56 +0530

दिनांक ०७.१२.२०२१

( बी. एस. संकपाळ )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 07.12.2021

Transcribed on : 07.12.2021

Checked & signed on : 07.12.2021

Sd/-

(P.V. Bhosale),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.